# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/02/2023 (बुधवार) दुपार


---

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील खुटांबा येथे दिनांक ३०/१/२०२३ चे २१.३० वा. ते ३१/१/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— घनश्याम मनोहरराव राऊत, वय ३० वर्ष, रा. खुटांबा ता. काटोल यांचे किराणा दुकानातील दुकानाचे कॅश काउंटर तोडुन आत प्रवेश करून त्यामध्ये ठेवलेले नगदी ११५००/— रू. ज्यामध्ये २० रू. च्या ३०० नोटा ६०००/— रू. १० रूपयाच्या ५५० नोटा ५५००/— रू. असे एकुण नगदी ११५००/—रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले व गावामध्ये राहणारा मोहन अरून डाखोळे याचे किराणा दुकानाचा दरवाजा तोडून त्याचे दुकानाचे काउंटरमधून नगदी २०००/— रू. असे एकुण १३५००/— रूपये नगदी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जवाहर चव्हाण पोस्टे काटोल हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कळमेश्वर** — दिनांक २८/०१/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादी यांचा १४ वर्ष १० महिने अल्पवयीन मुलगा याला कोणीतरी अज्ञात ईसमाने त्याच्या अज्ञात पणाचा फायदा घेवून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ३९७ कामडी पो.स्टे. कळमेश्वर हे करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील घरतवाडा येथे दिनांक ३०/०१/२०२३ चे २२.३० वा. ते दिनांक ३१/०१/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— लिलाधर मारोतराव गायकवाड, वय ४५ वर्ष, रा. घरतवाडा ह. मु. अनुसयापुरम काटोल ता. काटोल यांचे घरी असलेल्या दुकानातील लोखंडी ड्रॉपमधील नगदी ८०००/— रूपये कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचे शटरचा ताला तोडून चोरून नेले व गावातील शरद बोंडे यांचे घरातून नगदी ५०००/— रूपये व जुनी चांदीची समई १५ तोळे किंमती अंदाजे ३०००/— रू., दोन नग चांदीच्या वाटया अंदाजे ४ तोळे किंमती अंदाजे ८००/— रू. चांदीचे चमचे २ किंमती अंदाजे ४००/— रू. चांदीचे ताट अंदाजे ५ तोळे किंमती अंदाजे १०००/— रू. चांदीचे कुअरी वजन १ तोळा किंमती अंदाजे २००/— रू. एकुण २७ तोळे चांदीचे भांडे एकुण किंमती अंदाजे ५४००/— रू. असा एकुण १८४००/— रूपयाचा मुददेमाल अज्ञात चोराने दुकानाचे शटरचा ताला तोडून तसेच शरद बोंडे यांचे घराचे कुलुप तोडून आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १६४६ लक्ष्मण रूडे पोस्टे काटोल मो. नं ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**